ISSN- 2349-638x

Impact Factor
7.149

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

Peer Reviewed and Indexed Journal

Special Issue

## Natural Resources and Sustainable Development

29th July 2021

Special Issue - 95

Chief Editor:

Mr. Pramod P. Tandale

Executive Editor

Dr. Arjun Rajage

Principal

Rajarshi Shahu Arts and Commerce College, Rukadi

Tal-Hatkanangale, Dist-Kolhapur (Maharashtra, India)

Co-Editor

Dr. V. B. Desai

Dr. A. S. Patil

Shri. A. A. Bulle

Dr. K. A. Shinde

No part of this Special Issue shall be copied, reproduced or transmitted in any form or any means, such as Printed material, CD – DVD / Audio / Video Cassettes or Electronic / Mechanical, including photo, copying, recording or by any information storage and retrieval system, at any portal, website etc.; Without prior permission.

**Aayushi International Interdisciplinary Research Journal**

ISSN 2349-638x

Special Issue No.95

29th July 2021

**Disclaimer**

Research papers published in this Special Issue are the intellectual contribution done by the authors. Authors are solely responsible for their published work in this special Issue and the Editor of this special Issue are not responsible in any form.

| | | | |
|---|---|---|---|
| 174. | प्रा. सागर हरिभाऊ दांदडे | सौरऊर्जा आणि शाश्वत विकास | 674 |
| 175. | प्रा.डॉ. देशमुख एस.बी. | महाराष्ट्रातील मासेमारी एक भौगोलिक विवेचन विशेष संदर्भ कोल्हापुर जिल्हा | 676 |
| 176. | डॉ. सुवर्णा प्रकाश पाटील | महिलांच्या विकासातील सण-उत्सवाचे महत्व | 679 |
| 177. | प्रणाली विकास परिमल<br>डॉ. उमेशचंद्र ब. मडावी | वर्धा जिल्ह्यातील विविध आजारामुळे होणारे मृत्यू व त्या संदर्भातील उपाययोजना | 685 |
| 178. | डॉ. धेडे डी. आर. | महाराष्ट्रातील नैसर्गिक संसाधने आणि शाश्वत विकास | 688 |
| 179. | प्रा. राहुल अनिल देवमारे | डॉ. डी वाय पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड अत्रेप्रेनर डेव्हलपमेंट येथील ग्रंथालयामार्फत भ्रमणध्वनी द्वारे दिल्या जाणाऱ्या सेवा | 695 |
| 180. | डॉ. विनोंद व्यंकटराव चिंते | पर्यावरण – पूरक ऊस उत्पादनाचे अधूनिक तंत्र | 698 |
| 181. | डॉ. मोहन गोविंद लोंढे | अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील निसर्गचित्रण | 702 |
| 182. | डॉ. राजेंद्र तुळशीदास आहिरे | भारतातील शाश्वत शेती विकास : समस्या व आव्हाने - एक दृष्टिक्षेप | 707 |
| 183. | प्रा.डॉ.आंधळे बी. व्ही. | शाश्वत विकासात लोकशाहीची भूमिका | 713 |
| 184. | प्रा. संगिता कैलास पवार | शिक्षण क्षेत्रात पर्यावरण विषयाचे महत्व | 716 |
| 185. | डॉ. बी.डी. इंगवले | सिंधुदुर्ग जिल्हयात राबविलेल्या फळझाड योजना — एक चिकित्सक अभ्यास | 718 |
| 186. | Sainath Satwaji Kumbhare | नैसर्गिक संसाधने आणि सातत्यपूर्ण विकास | 725 |
| 187. | डॉ. शंकर दळवी | उदय प्रकाश के कहानियो में महानगरीय जीवन | 728 |
| 188. | श्री चव्हाण जी. एस.<br>प्रा डॉ राठोड व्ही. आर. | कराड तालुक्यातील शाश्वत पर्यटन विकास : काळाची गरज | 730 |
| 189. | *प्रा. अमर अण्णा बूल्ले* | *राजकीय संस्कृती: व्यापकतेकडून संकुचिततेकडे* | 736 |
| 190. | समीर हिंदुराव गायकवाड | भारतातील नैसर्गिक संसाधने आणि शाश्वत विकास | 740 |
| 191. | Machindernath Maruti Suyawanshi | भारतीय राज्यघटना आणि शाश्वत विकास | 746 |
| 192. | श्री. भागवत भगवान देवकाते | के. एम. मुंशी के अनूदित पौराणिक उपन्यास 'बंसी की धुन' में चित्रित प्राकृतिक संसाधन और मानवी जीवन का चित्रण | 750 |

# सिंधुदुर्ग जिल्हयात राबविलेल्या फळझाड योजना – एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. बी.डी. इंगवले,**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
वैभववाडी, ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग.

**प्रस्तावना–**

कोकण विभागाच्या कृषी विकासाच्या दृष्टीने फळ बागायतीस अनन्य साधारण महत्व आहे. कोकणातील रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्हयांची जमीन व हवामान फळ पिकांसाठी अतिशय पोषक आहे. फळबाग लागवड नियोजन पूर्वक केल्यास फक्त या जिल्हयांचाच नव्हे तर संपुर्ण महाराष्टाचा आर्थिक पाया शाश्वत व बळकट करण्याची क्षमता या जिल्हयामध्ये आहे. आज कोकण विभागामध्ये जवळपास १.५० लाख हेक्टर आंबा व तेवढीच काजूची लागवड झालेली असून त्यापेकी अधिक क्षेत्र हे रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील आहे.

**अभ्यास क्षेत्र (Study Area)**

प्रस्तुत संशोधनासाठी सिंधुदुर्ग जिल्हयाची निवड केली आहे. पश्चिमेला निळाशार अथांग सागर, पुर्वेस सहयाद्रीच्या उंचच–उंच पर्वत रांगा, विजयदुर्ग, सिंधुदुर्ग सारखे दुर्ग, मध्येच दिसणाऱ्या आमराई, काजूच्या बागा, नारळी – पोफळीची झाडे, सागाची वने, गावो–गांव असलेली पूरातन मंदीरे या सर्वांनी हा भाग समृध्द झाला आहे. राज्याच्या ७२० किलोमीटर किनारपट्टी पैकी १२१ किमोमीटर किनारपट्टी सिंधुदुर्ग जिल्हयाला लाभली आहे. कोकणातील हवामान व जमीन फळझाड लागवडीला अनुकूल असल्यामुळे या जिल्हयामध्ये आंबा, काजू, नारळ, सुपारी, कोकम, चिकू, फणस इ. फळझाड लागवड झालेली दिसून येते. यामध्ये आंबा व काजू या पिकांचा मोठा वाटा आहे.

**प्रस्तुत संशोधनाचा विषय–**

**''सिंधुदुर्ग जिल्हयात राबविलेल्या फळझाड योजना – एक चिकित्सक अभ्यास''** असा आहे.

**गृहितक –**

सदर शोध निबंधासाठी खालील गृहितक निवडण्यात आलेले आहे.

''सिंधुदुर्ग जिल्हयात राबविलेल्या फळझाड योजनामुळे जिल्हयाच्या आर्थिक विकासात वाढ झालेली आहे''.

**संशोधनाची उद्दिष्टये –**

प्रस्तुत शोध निबंधासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) सिंधुदुर्ग जिल्हयातील भूमिउपयोजन पीक रचनेचा अभ्यास करणे.

२) रोजगार हमी योजनेअंतर्गत लागवड करण्यात आलेल्या फळांविषयी माहिती घेणे.

३) सिंधुदुर्ग जिल्हयातील किफायतशीर फळझाड लागवडीचे नियोजन अभ्यासणे.

**संशोधन पध्दती व माहिती संकलन –**

**संशोधनाची पध्दती –**

सदर संशोधन विषयाचे महत्व लक्षात घेता योग्य संशोधन पध्दती या अभ्यासासाठी स्विकारण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधनाचा प्रकार वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे. कारण जिल्हयातील फळबाग लागवडीच्या विविध वैशिष्टयांचे विश्लेषण करणे हा त्यामागचा उद्‌देश आहे.

**तथ्य संकलन –**

प्रस्तुत संशोधन प्राप्त तथ्यांच्या आधारे सखोल अध्ययनावर आधारित आहे. तथ्य संकलनासाठी प्रामुख्याने प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे.

**सिंधुदुर्ग जिल्हा आणि भूमि–उपयोजन–**

सिंधुदुर्ग जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्र ५ लाख ४८ हजार हेक्टर एवढे असून त्यापैकी विविध पिकाखालील क्षेत्र तसेच जमिनीची विगतवारी पुढीलप्रमाणे–

**तक्ता क्र. १**

| अ.नं. | बाब | क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| १) | जंगलव्याप्त क्षेत्र | ३६,३१५ हेक्टर (७.१०%) |
| २) | शेतीला उपलब्ध नसलेली जमीन<br>अ) बिगरशेती वापराखालील जमीन<br>ब) पडीक व लागवड लायक नसलेली जमिन<br>क) अ + ब | <br>६,७७८ हेक्टर (१.३४%)<br>१,०४,८६७ हेक्टर (२०.७७%)<br>१,११,६४५ हेक्टर (२२.११%) |
| ३) | **पडीक जमिनी व्यतिरिक्त लागवड न केलेली जमीन**<br>**अ) कायम गुरे चरणे व इतर जमीन**<br>**ब) झाडे झुडपाखालील जमिन**<br>**क) लागवडीयोग्य परंतु पडीक जमीन**<br>**ड) अ + ब + क** | ११,०३१ हेक्टर (२.१९%)<br>**८२,२११ हेक्टर (१६.२९%)**<br>**३८,२६४ हेक्टर (७.५८%)**<br>**१,३१,५०६ हेक्टर (२२.०७%)** |
| ४) | पडीक जमीन<br>अ) चालू पड जमीन<br>ब) इतर पड जमीन<br>क) एकूण पड | <br>९,२३३ हेक्टर (१.८३%)<br>६८,५२२ हेक्टर (१३.५७%)<br>७७,७५५ हेक्टर (१५.३०%) |
| ५) | पीकाखालील क्षेत्र – निव्वळ क्षेत्र<br>फुलझाडे सह | १,४७,५०० हेक्टर (२९.२२%) |

वरील तक्त्यावरून असून आढळून येते की, जिल्हयातील एकूण भौगोलिक क्षेत्राचा विचार करता जंगलव्याप्त क्षेत्र ३६,११५ हेक्टर (७.१८%) इतके असून ते सर्वात कमी आहे. पडीक जमिन आणि पडिक जमिनी व्यतिरिक्त क्षेत्र तसेच शेतजमिनीस उपलब्ध नसलेले क्षेत्र या सर्व क्षेत्राचा

भविष्यात फळझाड लागवडीच्या विकासासाठी उपयोग घेऊ शकतो असे संशोधन आकडेवारीवरून आढळून येते.

**महाराष्ट्राची रोजगार हमी योजना –**

ग्रामीण भागातील बेकारी, दारिद्रय यावर उपाय म्हणून राज्य शासनाने १५ कलमी कार्यक्रमाचा भाग म्हणून राज्यस्तरावर रोजगार हमी योजना एक खास कार्यक्रम म्हून १९६५ पासून कांही मर्यादित भागात राबविण्यात आला. ही वैशिष्टयपूर्ण योजना राबविणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य होते. १९९०–९१ पासून रोजगार हमी योजनेशी फळझाड लागवड कार्यक्रमाची सांगड घालण्यात आली.

**रोजगार हमी योजनेअंतर्गत लागवड करण्यात आलेल्या फळांविषयी माहिती**

**आंबा –**

महाराष्ट्रात जवळ जवळ सर्व जिल्हयात आंब्याची लागवड होते. कोकण विभागात सर्वात जास्त क्षेत्र लागवडीखाली आहे. कोकणातील डोंगर उताराच्या व वरकस पडिक जमिनी आणि दमट व कोरडे हवामान या पिकोंस योग्य आहेत. हापूस, रत्ना, सिंधु, कोकण रूची, सुवर्णा या जाती कोकण कृषी विद्यापीठाने विकसित केल्या आहेत. कोकण विभागासाठी रत्ना, केसर, सिंधु या आंब्यांच्या जातीची लागवडीसाठी शिफारस केलेली आहे.

**काजू –**

काजू हे परकीय चलन मिळवून देणारे महत्वाचे पीक आहे. महाराष्ट्रात काजू या फळझाडांची लागवड कोकण विभागातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे आणि रायगड जिल्हयात आणि कोल्हापूर जिल्हयाच्या पश्चिम भागात आढळून येते. विशेषत: वरकस जमिनीत काजूची झाडे चांगली पोसतात. कोकणातील उष्ण व दमट हवामान या पिकास फारच अनुकूल आहे. वेंगुर्ला ६, ७, ८ या जातीची झाडे उत्कृष्ट प्रतिच्या बियांचे उत्पादन देतात.

**नारळ –**

बहुवर्षिय, बहुउपयोगी असे फळझाड आहे. या झाडास कल्पवृक्ष असे म्हणतात. भारतातील नारळ लागवडीखालील एकूण क्षेत्रांपैकी महाराष्ट्रात फक्त १% क्षेत्र आहे. महाराष्ट्रातील नारळ लागवडीखालील क्षेत्र प्रामुख्याने कोकण विभागापुरतेच मर्यादित आहे. जमीन किमान १ मीटर खोलीपर्यंतची कसदार भूसभुसीत आणि पाण्याचा निचरा होणारी असावी. बाणावली, प्रताप, टी × टी या सुधारित जाती आणि अधिक उत्पादनाच्या जाती आहेत. नारळ बागेतून काळी मिरी, लवंग, जायफळ, दालचिनी, केळी, हळद, अननस इ. अंतरपिके घेऊन उत्पन्न मिळविता येते.

**सुपारी –**

सुपारीस पोफळी, अरेकानट, पाम, बीटलनट पाम या नावाने ओळखले जाते. भारतात सुपारीखालील २५००० हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी २५०० हेक्टर क्षेत्र महाराष्ट्रात आहे. कोकण विभागात सुपारी लागवड अधिक आहे. या पिकास समुद्र काठाच्या वाळूच्या, गाळाच्या, पाण्याचा चांगल्या प्रकारे निचरा होणाऱ्या बारमाही पाण्याच्या जमिनी मानवतात. श्रीवर्धिनी, मंगल या सुपारीच्या सुधारित जाती आहेत.

**चिकू –**

चिकूचे मुळ स्थान मेक्सिको हा देश असून त्याचा प्रसार इतर देशात व भारतात झाला. महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात चिकूची लागवड यशस्वी होऊ शकते. निचरा आणि बारमाही पाण्याची

जमिन तसेच दमट आणि कोरडया या दोन्ही हवामानात चिकूची वाढ चांगली होते. कलापती, क्रिकेट बॉल, आणि छत्री या सुधारित जाती आहे.

**कोकम –**

पाण्याचा चांगला निचरा जमीन आणि उष्ण व दमट हवामान योग्य आहे. लागवडीत ९०% मादी व १०% नराची झाले ठेवावीत. कोकण अमृता आणि कोकण हातीस या सुधारीत जाती विद्यापीठाने विकसित केल्या आहेत.

**सिंधुदुर्ग जिल्हियातील किफायतशीर फळझाड लागवड नियोजन**

सिंधुदुर्ग जिल्हयात फळझाड लागवड करतांना जमिनीचा उंच सखलपणा, चांगले, वातावरण, उतार इ. बाबींचा विचार न करता लागवड केलेली आहे. अशा फळझाड लागवडी तोटयात जाण्याची दाट शक्यता असते.

**आंबा लागवड पुर्व नियोजन –**

हापूस आंब्यासाठी वारा, भरपुर सुर्यप्रकाश आणि टेकडीचा भाग असणारी जमिन योग्य असते. वेंगुर्ला, देवगड, मालवण हे तालुके समुद्र किनाऱ्या लगत आहेत. परंतु देवगड, विजयदुर्ग परिसरात समुद्राजवळ टेकडया नसल्यामुळे किनाऱ्यावरून येणारे वारे थेट शिरगांवपर्यंत पोहचू शकतात. तसेच पवन चक्क्यामुळे आंब्यांच्या पानामधून मोठया प्रमाणावर बाष्पीभवन होते. त्यामुळे आंबे लवकर व नियमित येतात. तसेच येथे कमाल – किमान तापमानामध्ये फारसा फरक नसतो. अशी नैसर्गिक ठेवण मालवण, वेंगुर्ला तालुक्यात दिसून येत नाही. हापूस सोबत १५ ते २०% केसर अथवा रत्ना या जातीची लागवड करावी. त्यामुळे फळधारणा वाढण्यास मदत होते.

**काजू लागवड पुर्व नियोजन –**

डोंगर उतारावर व किनाऱ्यापासून दूर असणाऱ्या टेकडयांची काजू लागवडीसाठी निवड करणे शक्य ठरते. कारण टेकडयावर वारे चांगले वाहतात. धुके कमी काळ व कमी प्रमाणात असते. त्यामुळे फळधारणा खूपच चांगली असते.

**नारळ, सुपारी, मसाला पिके लागवड पुर्व नियोजन –**

ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे. उदा. नाला, नदीकिनारा, टेकडीचा पायथा या जागा नारळ सुपारी तसेच मसाला पिके लागवडीसाठी योग्य आहेत. नारळ चांगल्या रोपांची निवड शासकीय रोपवाटीकेतून करावी. नंतर झाडे मोठी झाल्यावर काळी मिरी, जायफळ, लवंग, दालचिनी इ. पिके घेता येतात.

**सिंधुदुर्ग जिल्हयात रोजगार हमी योजनेअंतर्गत राबविलेली तालुका निहान फळझाड योजना –**

**१) वेंगुर्ला –**

१९९०–१९९१ ते २००४–२००५ या काळात आंबा खालील एकूण क्षेत्र ११३३.३५ हेक्टर, काजू १५८.२९ हेक्टर क्षेत्र, नारळ ३९७.५८ हेक्टर क्षेत्र, चिकू ७.८० हेक्टर क्षेत्र आणि इतर फळे ३९.५९ हेक्टर क्षेत्र तसेच २००५ ते २०१५ या काळात आंबा ४९१.४५ हेक्टर क्षेत्र, काजू ३५७.०२ हेक्टर क्षेत्र, नारळ ७४.८४ हेक्टर क्षेत्र, चिकू १.५६ हेक्टर क्षेत्र, व इतर फळे १०९.६२ हेक्टर क्षेत्र असल्याचे आढळून येते. या योजनेअंतर्गत नंतरच्या काळात या सर्व पिकांच्या लागवडी खालील क्षेत्रात घट झालेली आहे. ही उल्लेखनीय बाब नाही.

**२) कणकवली —**

१९९०—१९९१ ते २००४—२००५ या काळात आंब्याचे एकूण क्षेत्र ८७०.१८ हेक्टर, काजू ६२२९.९६ हेक्टर क्षेत्र, २००५ ते २०१५ या काळात काजू १९४४.६८ हेक्टर क्षेत्र, आंबा १९८.६६ हेक्टर क्षेत्र, नारळ ११४.९७ हेक्टर इतर पिकाखाली १३५.७१ हेक्टर क्षेत्र यावरून रोजगार हमी योजनेअंतर्गत फळझाड लागवड कार्यक्रम राबवून सुध्दा या पिकाचे क्षेत्र हळू हळू कमी होत गेले.

**३) कुडाळ —**

कुडाळ तालुक्यात १९९०—१९९१ ते २००४—२००५ या काळात आंब्याचे एकूण क्षेत्र १७६४.३३ हेक्टर, काजू ६५५१.७९ हेक्टर क्षेत्र, नारळ २२३२. हेक्टर क्षेत्र, इतर फळे ५९.७ हेक्टर क्षेत्र तर २००५ ते २०१५ या काळात आंबा ४१९.६३ हेक्टर क्षेत्र, काजू १८१४.०५ हेक्टर क्षेत्र, नारळ ४५३.३४ हेक्टर, चिकू १४.२४ हेक्टर आणि इतर फळाखाली ०४.६२ हेक्टर क्षेत्र असल्याचे आढळून आहे. आंबा, काजू या पिकांची लागवड कमी असून नारळ चिकू इतर फळे लागवड अधिक आढळून आली.

**४) मालवण —**

१९९०—१९९१ ते २००४—२००५ या काळात काजू ४६४९.०० हेक्टर क्षेत्र, आंब्याचे क्षेत्र १७८८.५९ हेक्टर, नारळ ११५८.०८ हेक्टर क्षेत्र, इतर फळे ८६.१३ हेक्टर क्षेत्र तर २००५ ते २०१५ या काळात आंबा ६५८.३९ हेक्टर क्षेत्र, काजू १६५३.३७ हेक्टर क्षेत्र, नारळ २८.२२ हेक्टर या तिन्ही पिकांचे क्षेत्र कमी झाल्याचे आढळते. याच काळात चिकूचे क्षेत्र वाढले.

**५) वैभववाडी —**

सन १९९०—१९९१ ते २००४—२००५ या काळात आंबा लागवड ४०५.०० हेक्टर क्षेत्र, काजू क्षेत्र २८७१.०० हेक्टर, नारळ १३२.७८ हेक्टर क्षेत्र, इतर फळे २२.४२ हेक्टर क्षेत्र तर २००५ ते २०१५ या काळात आंबा १३०.९८ हेक्टर क्षेत्र, काजू ९८३.८२ हेक्टर क्षेत्र, नारळ ४४.२५ हेक्टर इतर पिके २१.९९ हेक्टर क्षेत्र लागवड करण्यात आलेली आहे. या पिकांचे क्षेत्र कमी झाल्याचे आढळते.

**६) देवगड —**

१९९०—१९९१ ते २००४—२००५ या काळात आंब्याचे क्षेत्र ४७१४.०० हेक्टर क्षेत्र, काजू क्षेत्र १०४.०५ हेक्टर, नारळ १९९.६३ हेक्टर क्षेत्र, इतर फळे २४.१८ हेक्टर क्षेत्र तर २००५ ते २०१५ या काळात आंबा १८७९.७ हेक्टर क्षेत्र, काजू ४६५.४२ हेक्टर क्षेत्र, नारळ ३०.४३ हेक्टर इतर ४.१८ हेक्टर क्षेत्र. अभ्यासावरून हे स्पष्ट होते की, आंबा, काजू, नारळ व इतर पिकांचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होत आहे.

**७) सावंतवाडी —**

१९९०—१९९१ ते २००४—२००५ या काळात आंबा, काजू नारळ, चिकू व इतर फळांखाली एकूण १२४१२.२३ हेक्टर क्षेत्र होते. रोजगार हमी योजने नंतर २००५ ते २०१५ या काळात एकूण क्षेत्र ४५४८.६६ हेक्टर पर्यंत कमी झाल्याचे संशोधनातून आढळून आले आहे.

**सिंधुदुर्ग जिल्हा —**

जिल्हयातील फळ लागवडीखालील क्षेत्राचे वर्गीकरण केले असता जिल्हयात १९९०—१९९१ ते २००४—२००५ या कालावधीत एकूण ५०९०६.४ हेक्टर क्षेत्र पिकाखाली असून त्यापैकी आंबा ११०४६.७७ हेक्टर, काजू ३२७०८.८७ हेक्टर, नारळ ६८६९.६८ हेक्टर तर इतर पिकांखाली ३७३.३८ हेक्टर क्षेत्र आहे. २००५ ते २०१५ या काळात एकूण क्षेत्र १७७१०.१६ हेक्टर असुन

त्यापैकी आंबा ३९८५.२३ हेक्टर, काजू १०७६६.२७ हेक्टर, नारळ १४९९.११ हेक्टर, चिकू ४३.७१ हेक्टर, इतर पिकांचे १४२८.८४ हेक्टर क्षेत्र असल्याचे आढळून येते. यावरून जिल्हयात फळबाग लागवड योजना राबवून सुध्दा चिकूचा अपवाद वगळता आंबा, काजू, नारळ या प्रमुख फळ पिकांचे क्षेत्र कमी झाले आहे.

**निष्कर्ष –**

१) जिल्हयात रोजगार हमी योजनेअंतर्गत फळझाड लागवड लाभार्थी शेकऱ्यांकडे २.५ ते ५ एकर क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या जास्त आहे. १० ते १५ एकर कार्यक्षेत्र असणारे लाभार्थी देवगड, कुडाळ, वैभववाडी, मालवण आणि सावंतवाडी तालुक्यात आहेत.

२) जिल्हयात लागवडी योग्य पडीक जमीन क्षेत्र आणि कायम स्वरूपी पडिक जमिनीचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे. त्यामुळे फलोत्पादन लागवडीला आजही संधी आहे.

३) जिल्हयात देवगड, मालवण आणि कुडाळ तालुक्यात आंबा लागवड धारक क्षेत्र मोठे असल्याचे आढळते.

४) जिल्हयात रोजगार हमी योजना काळात सर्वच तालुक्यात काजू लागवड मोठया प्रमाणात झाल्याचे आढळून येते. कुडाळ, सावंतवाडी, वैभववाडी आणि वेंगुर्ला तालुकयात काजू लागवड धारक क्षेत्र जासत असल्याचे आढळते.

५) जिल्हयात कणकवली, कुडाळ, मालवण, सावंतवाडी आणि वेंगुर्ला तालुक्यात नारळ लागवड जास्त प्रमाणात झाल्याचे आकडेवारीवरून आढळून येते.

६) जिल्हयात दौडामार्ग, कुडाळ, मालवण, सावंतवाडी आणि वेंगुर्ला तालुक्यात सुपारी लागवडीचे प्रमाण अधिक आहे.

७) जिल्हयात कोकम आणि चिकू लागवड फारच अल्प असल्याचे संशोधनातून आढळून येते.

८) जिल्हयात स्त्रियापेक्षा पुरूष मजुरांना देवगड, कुडाळ, मालवण आणि सावंतवाडी तालुक्यात फार मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती झाली आहे. वर्षातील दैनंदिन कालखंडापेक्षाही फलोत्पादन कालखंडात स्त्री आणि पुरूषांना जास्त मजूरी दर मिळतो असे संशोधनातून आढळून आले.

९) जिल्हयात रोजगार हमी योजना सुरू झाल्यानंतरच्या म्हणजे १९९०—९१ ते २००४—२००५ या कालखंडात सर्वच फळ पिकांच्या लागवडीत फार मोठया प्रमाणात वाढ झाली असून त्यानंतर २००४—२००५ नंतर लागवडीत घट दिसून आली आहे.

**शिफारशी ( Suggation) —**

१) जिल्हयात या योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व जमाती इतर मागास प्रवर्गातील शेतकऱ्यांचा समावेश होणे आवश्यक आहे.

२) फळझाड लागवडीसाठी देण्यात येणारे अनुदान प्रत्यक्ष भौगोलिक परिस्थितीनुसार देण्यात यावे.

३) लाभार्थी शेतकऱ्यांनला लागवडीसाठी गुणात्मक आणि दर्जेदार कलमे उपलब्ध करून देणे.

४) योजनेअंतर्गत फळझाड लागवड करतांना दिल्या जाणाऱ्या सर्व निविष्ठा हंगामापूर्वी शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

५) जिल्हयात प्रत्येक तालुक्यात स्थानिक पातळीवर फळप्रक्रिया युनिट उपलब्ध करण्यासाठी लाभार्थी आणि शासनाने प्रयत्न करावेत.

६) पिक विमा योजना कार्यक्षम पध्दतीने राबविणे.

७) जिल्हयात आजही फार मोठया प्रमाणात पडित जमीन आहे. ही जमन लागवडीखाली आणण्यासाठी शासन पातळीवर अडचणी दूर करणे.

८) जिल्हयात नारळ, सुपारी, कोकम, चिकू, आवळा या फळ पिकांच्या लागवडीसाठी योजनेमार्फत शेतकऱ्यांना प्रवृत्त करणे.

९) सर्वच तालुक्यात माती परिक्षणानंतर लागवड करण्यासाठी कृषी विद्यापीठाने मार्गदर्शन करावे.

१०) आंब्यासाठी आधुनिक पध्दतीने साठवणगृहे, वातानुकुलीन यंत्रे निर्माण केल्यास आंब्यांची निर्यात होण्यास मदत होईल.

**संदर्भसूची —**

१) सुर्या गुंजाळ (संपादक, एप्रिल २००७) 'फळबाग लागवडीचे मुलतत्वे आणि कार्यपध्दती' प्रकाशन यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक.

२) सिंधुदुर्ग जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन मार्च २०१२—२०१३ अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई पान नं. ७.

३) कृषि पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास आणि मत्स्य व्यवसाय विभाग दिनांक ७ ऑगस्ट महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक रो.ह.यो. ४००७/प्र. क्र. ११२/९ अे मंत्रालय, मुंबई ३२.

४) गांगुर्डे किशोर — ''हमी रोजगाराची साथ केंद्राची'' लोकराज्य मासिक, प्रकाशन माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन पान नं. २३, २४, २५

५) Government of Maharashtra (1994) Economics Surve of Maharashtra Page No. 34.

६) WWW.dbskkv.org.aticdapolicentre (कृषी तंत्रज्ञान दैनंदिनी) पान नं. ४२, ४७, ५३, ५४, ५५, ६१ ते ६४, ५६ ते ६६, ६७, ६८, ६९

७) गोडसे/पाटील (प्रादेशिक फळ संशोधन केंद्र वेगुंर्ले — जुलै २००३) ''कोकणात फळबाग किफायशीर होण्यासाठी काटेकोर पुर्व नयोजनाची गरज बळीराजा मासिक नं. ५४ ते ५७

८) कृषी विभाग जिल्हयातील सर्व तालुके कृषी कार्यालये आणि कृषी विभाग, ओरोस कार्यालय, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग संकलित सांख्यिकीय माहिती.

ISSN 2349-638X
www aiirjournal.com